औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शनिवार दिनांक ३१.३.९० रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या ४८ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. अ. म. महाजन | उपसभापती/औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. बी. एन. माखिजा<br>विभागीय आयुक्त,<br>औरंगाबाद. | सदस्य |
| ४] श्री. सय्यद हुसेन<br>प्रभारी मनपा आयुक्त,<br>औरंगाबाद. | सदस्य |
| ५] श्री. द. मो. गोडघाटे,<br>उपसंचालक, नगररचना<br>औरंगाबाद. | सदस्य |

६] श्री. जंबगी कार्यकारी अभियंता, म. न. पा. औरंगाबाद हे मंडळाच्या बैठकीस हजर होते.

विषय क्र. १: दिनांक २८/२/९० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २५४

दिनांक २८/२/९० रोजी झालेल्या ४७ व्या सभेचा कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कायम करण्यात आला.

विषय क्र. २: मंडळाच्या विविध वसाहतीमधील सुविधाकरिता राखीव भूखंड कोणत्या उपयोगाकरिता वापरावेत ते निश्चित करणे.

. . .

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती सांगितली की, मंडळाच्या विविध वसाहतीमध्ये सुविधासाठी भूखंड आरक्षित आहे. नुतन विकसीत वसाहतीमध्ये रहिवाशी वास्तव्यास आल्यावर दैनंदिन उपयोगाच्या वस्तुंची दुकाने, बँक, समाज मंदीर कम्युनिटी हॉल, नर्सरी, शाळा, डिसपेंसरी, दवाखाना इत्यादी सुविधांची सोय उपलब्ध असणे आवश्यक असते. तसेच अशा प्रकारच्या भूखंडावर गृहनिर्माण वसाहती बरोबरच सोयी उपलब्ध न होऊ

. . . . २

शाकल्यास वसाहतीमध्ये अशा सोयीच्या अनुषंगाने विक्रेत्यांकडून अतिक्रमण करण्याचा कल दिसुन येतो.

या अनुषंगाने मा. विभागीय आयुक्त/औरंगाबाद श्री. माखिजासाहेब यांनी अशी विचारणा केली की, वसाहतीसाठी आवश्यक असणा-या इतर सुविधा उपलब्ध आहे काय ? आणि आता प्रस्तावित सुविधा दिल्यास इतर सुविधाकरिता भूखंडाची आवश्यकता नाही काय ? आणि हयाबाबत तपासूनच प्रस्ताव दिले आहेत काय. हयावर उपसभापतींनी असे सांगितले की, वसाहतीकरिता शाळा, नर्सरी, इत्यादीची सोय जवळच उपलब्ध असल्याने अशया भूखंडाचा वापर दुकानासाठी, समाज, मंदीर, कम्युनिट हॉल इत्यादीसाठी करावे.

ठराव क्र. २५५

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की, मंडळाच्या विविध वसाहतीमधील सुविधाकरिताचे भूखंड, दुकाने, समाज मंदीर, दवाखाने इ. साठी वापरावेत. सदर तपशील खाली दिलेला आहे. त्याप्रमाणे

| अ. क्र. | शहराचे नाव | सर्व्हे क्र/गट क्र. | सुविधा भूखंडाचे क्षेत्रफळ चौ. मी | उपयोग |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | जालना | स. क्र. ४४९, ४८०, ४८१ | १५९५. ०० | दुकानासाठी व दवाखान्यासाठी. |
| | | स. क्र. ४३० व ४३१ | ६००. ०० | दुकानासाठी |
| २. | नासिक | स. क्र. २६७ अमृतधाम नासिक | १६००. ५० | दवाखाना व समाज मंदीर |
| ३. | भुसावळ | स. क्र. १२२[भाग] | ७२०. ०० | कम्युनिटी फॅसिलीटी सेंटर |
| ४. | जळगांव | स. क्र. २९०/अ | ३२०. ०० | दुकानासाठी [कन्व्हीनियंट शॉपींग] |
| ५. | चोपडा | स. क्र. २२१ | ५८७. ५० | दुकानासाठी [कन्व्हीनियंट शॉपींग ] |

विषय क्र. ३: नासिक येथे मंडळ वेगवेगळया योजने अंतर्गत राबवित असलेल्या गृहनिर्माण योजना आणि त्या अनुषंगाने येणा-या अडचणीबाबत.

ठराव क्र. २५६
-----------

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, अमृतधाम नासिक येथील स. न. २६७ वर कार्यान्वीत असलेल्या विडी कामगार गृहनिर्माण योजनेसाठी पोहचमार्ग, विद्युतीकरण, पाणीपुरवठा इत्यादी येणा-या अडचणीबाबत, तसेच सातपूर नासिक येथील मंडळाच्या वसाहतीमधील उर्वरीत जागेवरील १०३ उच्च उत्पन्न गट गाळयांच्या योजनेच्या परवानगीबाबत व त्या अनुषंगाने येणा-या अडचणी बाबत संबंधीत खात्याच्या अधिका-यांची, मा. विभागीय आयुक्त/नासिक यांनी एक बैठक बोलावुन या प्रकरणी योग्य मार्ग काढावा अशी मंडळातर्फे विनंती करावी.

विषय क्र. ४: बांधकामाच्या निविदावर निर्णय घेण्याकरिता निविदा समितीचे गठण करणे.

ठराव क्र. २५७
----------

मंडळाने चर्चेअंती निविदा समिती खालील प्रमाणे गठीत करण्यास सर्वानुमते मंजूरी दिली.

| | | |
|---|---|---|
| १. आयुक्त, महानगरपालिका | नासिक/औरंगाबाद [नासिक/औरंगाबाद विभागातील कामानुरुप आमंत्रित] | [ अध्यक्ष ] |
| २. मुख्य अधिकारी | आमंत्रक | |
| ३. उपसंचालक नगररचना/औरंगाबाद | सभासद | |
| ४. मुख्य लेखा अधिकारी/औ.रंगाबाद मंडळ | सभासद | |

या मंडळाचे अंतर्गत मराठवाडा व नासिक विभागातील जिल्हे आहेत. ज्या विभागातील कामाच्या निविदा असतील त्याप्रमाणे नासिक/औरंगाबाद आयुक्त महानगरपालिका हे अनुक्रमे अध्यक्ष म्हणून सदर समितीचे कामकाज पाहतील.

....४

विषय क्र. ५: औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या, नविन औरंगाबाद सिडको एन-५, १५२ मध्यम उत्पन्न गटातील गाळा क्र. ७०४ च्या वाटपाबाबत.

ठराव क्र. २५८

---

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नविन औरंगाबाद सिडको एन-५, १५२ मध्यम उत्पन्न गटातील गाळा क्र. ७०४ हा कार्यालयीन उपयोगाच्या दृष्टीने व सर्व गाळेधारकांच्या कार्यालयीन सोईचा असल्याने सदर गाळा प्रशासकीय हित लक्षात घेता कार्यालयीन कामासाठी तुर्त आरक्षीत ठेवावा.

विषय क्र. ६: वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अंतर्गत होत असलेल्या अनाधिकृत बांधकामाला आळा घालण्याबाबत करावयाची कार्यवाही.

. . . .

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात समाविष्ट असलेल्या जमिनीवर काही जमिन मालकांनी व डेव्हलपर्स संस्थांनी अनधिकृत बांधकामे सुरु केलेली आहेत अश्या लोकांना प्रथम नोटीस देऊन अनधिकृत बांधकामे थांबविण्याची सूचना द्यावी.

यावर चर्चा करतांना मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी अशी सूचना केली की, विशेष नियोजन प्राधिकरण या क्षेत्रात किती अनाधिकृत कामे आहे त्याची पाहणी करुन माहिती द्यावी म्हणजे महसुल अधिका-यांशी व इतर अधिका-यांशी समन्वय साधून पुढील कार्यवाही करता येईल. उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, बहुतेक जी अतिक्रमणे झालेली आहेत ती सर्व शासकीय जमिनीवर आहे.

मा. विभागीय आयुक्त/औरंगाबाद यांनी असे सांगितले की, वाळूज विभागात जे अनाधिकृत बांधकामे आहेत त्याविषयी सर्वकष माहिती म्हणजे बांधकामास परवानगी आहे किंवा नाही, बांधकामास परवानगी कोणी व कधी दिली, जे बांधकाम झाले आहे ते निवासी/किंवा व्यापारी [कमर्शियल] आहे याची माहिती द्यावी.

यासंबंधी चर्चा करतांना श्री. द. मो. गोडघाटे यांनी अशी सूचना केली की, अनाधिकृत बांधकामे करणा-यांना नोटीस देतांना नियमाचे काटेकोरपणे अभ्यास करूनच नोटीशी द्याव्यात म्हणजे पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यास अडचणी निर्माण होणार नाहीत.

मंडळाच्या सदस्याकडून अशी सूचना आली की, नोटीस इंग्रजी व मराठी मधून देण्यांत यावी.

ठराव क्र. २५९

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात चालु असलेल्या अनाधिकृत बांधकामे करणा-या व्यक्तींना एक नोटीस देऊन, अनाधिकृत बांधकामे थांबविण्यास सांगावे जर अनधिकृत बांधकाम बंद न केल्यास त्याचे काय परिणाम होतील यासंबंधी नोटीसमध्ये स्पष्ट उल्लेख करावा.

विषय क्र. ७: बीड येथील खडेश्वरी जवळील सर्व्हे क्र. ११३ मधील पुरग्रस्तासाठी बांधण्यांत येणा-या वसाहतीमधील सुविधाबाबत.

ठराव क्र. २६०

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेतला की, बीड येथील खडेश्वरी जवळील सर्व्हे क्रमांक ११३ मधील पुरग्रस्तांसाठी बांधण्यांत येणा-या वसाहतीमधील सुविधा कामासाठी लागणा-या खर्चाची १००% संभाव्य रक्कम व त्यासाठी लागणारा अतिरिक्त आकार [सेन्टेज चार्जेस] जो १५% आहे त्यासहीत जर जिल्हाधिकारी बीड यांनी म्हाडाकडे आगाऊ भरणा केल्यास वरील काम मंडळाने करावे.

आयत्यावेळचा विषय

विषय क्र. १: उपजिविकेसाठी आजूबाजूच्या ग्रामीण भागातून शहराकडे येणा-या स्थलांतरीतांच्या निवा-याचा विचार करून संभाव्य झोपडपट्टीवाढ थांबविणेबाबत.

ठराव क्र. २६१

मा. आयुक्त, नासिक विभाग, नासिक ह्यांनी पाठविलेल्या प्रस्तावाची माहिती उपाध्यक्षांनी दिली याबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. तथापी मा. आयुक्त नाशिक बैठकीस हजर नसल्याने त्यावर त्याचे विचार अध्यक्षांना व सभासदांना समजू शकले नाहीत सबब सदरचा विषय पुढील सभेचे वेळी चर्चेस ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.